मा. कोर्टे व्ही

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** कोपरखैरणे
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0168 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/04/2023 08:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 28/04/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/04/2023
**Time From (वेळेपासून):** 13:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/04/2023 **Time (वेळ):** 07:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/04/2023 07:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
आग्नेय, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** नवी मुंबई महानगर पालिका,कोपखैरणे वर्ड, परिमंडळ- 2, ,नवी मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

S.No. (अ.क्र.) 10

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रितेश भालचंद्र पुरव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 1801,चाळ नं 02,शिवकॉलनी, सेक्टर नं 1,एरोली,नवी मुंबई ,कोपरखैरणे, नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 1801,चाळ नं 02,शिवकॉलनी, सेक्टर नं 1,एरोली,नवी मुंबई ,कोपरखैरणे, नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9029267908

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनेश राजेंद्र सोनावणे | | | 1. 402,जिज्ञासा कोऑप हौसिंग सोसायटी,चौथा मजला, शालू हॉटेलच्यामागे,पडले देसाई गाव, ठाणे पश्चिम,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

एन.सी.आ
अन्वेषण फॉर्म



| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500000 | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

0.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 29/04/2023

मी रितेश भालचंद्र पुरव, वय- 38 वर्ष, धंदा- नोकरी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य व पाणी पुरवठा) 'बी' विभाग कार्यालय, नेरूळ अतिक्रमण विभाग, नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई, राहणार रूम नं. 1801, चाळ नं. 02, कॉलनी, सेक्टर नं. 1, कोपरखैरणे, नवी मुंबई मोबाईल नंबर 9029267908 असा असून समक्ष फिर्यादी जबाब लिहुन देतो की,

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबासमवेत राहत आहे. मी नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई येथे सन 2010 ते 2021 याकालावधीत कनिष्ठ अभियंता यापदावर कंत्राटीतत्वावर कार्यरत होतो. त्यानंतर 2021 मध्ये मला कनिष्ठ अभियंता यापदावर नवी मुंबई महानगर पालिका सेवेत नियमित केले आहे. मी सन 2021 पासून 'बी' विभाग कार्यालय, नेरूळ अतिक्रमण विभाग, नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई येथे कार्यरत आहे. जा.क्र.न.मु.म.पा./अति/आस्था/टे.4/925/2023, दि. 24/04/2023 अन्वये मा. उप आयुक्त (अतिक्रमण), नवी मुंबई महानगर पालिका यांचेकडील माझे बदलीचे कार्यालयीन आदेश दिनांक 24/04/2023 रोजी मला मुख्यालय, नवी मुंबई महानगर पालिका, बेलापुर येथून प्राप्त झाले होते. त्याबाबत मी डॉ.अमरीश पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग, नवी मुंबई महानगर पालिका यांची भेट घेवून त्यांना मला नेरूळ येथेच काम करू दया अषी विनंती केली. त्यावेळी उप आयुक्त श्री. पटनिगीरे यांनी मला उप आयुक्त परिमंडळ-2 कार्यालय, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील लिपीक दिनेश सोनवणे यांना भेटण्यास सांगून ते जसे सांगतील तसे करण्यास सांगितले.

उपआयुक्त श्री. पटनिगीरे यांचे सांगणेप्रमाणे मी उप आयुक्त परिमंडळ- 2 कार्यालय, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे लिपीक श्री. दिनेश सोनवणे यांची भेट घेतली असता, श्री. दिनेश सोनवणे यांनी मला ' पाच लाख रूपये दया तुमची बदली रद्द करून ऑर्डर काढतो आणि सी.आर. (वार्षिक गोपनिय शेरे) लवकर पाठवून देतो ' असा निरोप उपआयुक्त श्री. पटनिगीरे यांनी दिला असल्याचे सांगितले. त्यानंतर दिनांक 27/04/2023 रोजी मी श्री. दिनेश सोनवणे यांचे निरोपाप्रमाणे त्यांना कोपरखैरणे येथील उप आयुक्त परिमंडळ -2 कार्यालय येथे भेटलो असता, श्री. दिनेश सोनवणे यांनी पुन्हा माझेकडे श्री. पटनिगीरे, उप आयुक्त यांच्यावतीने पैशाची मागणी करून मला 28/04/2023 रोजी उप आयुक्त परिमंडळ-2 कार्यालय, कोपरखैरणे येथे येण्यास सांगितले.

डॉ. अमरीश पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) व उप आयुक्त, अतिक्रमण विभाग, मुख्यालय यांनी श्री. दिनेश सोनवणे यांच्यामार्फत मागणी केलेली लाचेची रक्कम मी त्यांना दिली नाही तर ते माझी बदली पुर्ववत करणार नाहीत तसेच माझे वार्षीक गोपनिय षेरे पाठविण्यामध्ये अडथळा निर्माण करतील अशी माझी खात्री झाल्याने त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत मी दिनांक 28/04/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष तक्रार दिली.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाचेची मागणीची सत्यता पडताळणी करण्याकरीता पो.उप अधीक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांनी उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई कार्यालयास लेखी पत्र देवून दोन शासकिय पंच साक्षीदार मागविले. पंच साक्षीदार अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर श्री. शिवराज म्हेत्रे, पोलीस उप अधीक्षक, अ.सी.बी. नवी मुंबई यांनी पंचांना माझी ओळख करून दिली. सदरवेळी मी पंच साक्षीदार यांना माझे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगितली व माझी लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली

असता पंचानी वाचुन माझे तक्रारीवर सही केली. त्याचवेळी पो.उप अधीक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांनी मला सदर पडताळणी पथकातील पोलीस अंमलदारांची ओळख करून दिली.
त्यानंतर आम्ही सर्व लाचेच्या मागणीचे पडताळणीकरीता अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयातुन निघून कोपरखैरणे, नवी मुंबई येथील टिळक इंजिनिअरींग कॉलेज जवळ आलो. त्यावेळी मी पो.उप.अधीक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांच्या सुचनेप्रमाणे 13;53 वाजता मी माझे मोबाईल नं. 9029267908 वरून श्री. दिनेश सोनवणे यांचे मोबाईल नं. 9892739653 वर व्हॉट्सअप कॉल करून श्री. दिनेश सोनवणे यांना भेटण्यास येत असल्याचे सांगितले असता, लोकसेवक श्री. सोनवणे हे कार्यालयाचे खाली उभे असल्याचे त्यांनी सांगून मला भेटण्यास येण्यास सांगितले. सदरचे फोनवरील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले आहे.
त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लोकसेवक यांचे लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी करीता मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच साक्षीदार यांचे समवेत दिनांक 28/04/2023 रोजी 13;55 वा ते 14;13 वाजे दरम्यान परिमंडळ-2 कार्यालय, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे डॉ. अमरीश पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग, मुख्यालय यांचे केबिनच्या बाहेर लिपीक श्री. दिनेश सोनवणे यांना भेटलो. त्यावेळी आमच्यात काहीवेळ बोलणे झाल्यानंतर दिनेश सोनवणे यांनी माझेसोबत असलेले पंचाबाबत विचारणा केली असता, पुर्वनियोजीत सुचनाप्रमाणे मी त्यांना मित्र असल्याचे सांगितले. त्यानंतर दिनेश सोनवणे यांनी माझेकडे " किती आणले आहेत " असे बोलत पैशाबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना दोन लाख आणले असून उर्वरीत रक्कम जमा करण्यासाठी दोन तासाची मुदत देण्याची विनंती केली. तसेच त्यांच्याकडे " पाच लाखातुन कमी नाही करणार" अषी विचारणा केली असता, श्री. दिनेश सोनवणे यांनी मला " आता तु बोलास ते सांगितले" असे मला बोलले. त्यानंतर मी दिनेश सोनवणे यांच्याकडे साहेबांना म्हणेजच श्री. पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) यांना भेटून देण्याची विनंती केली. त्यावेळी श्री. दिनेश सोनवणे यांनी मला त्याबाबत टाळाटाळ करीत " साहेब.. बोलणार तर नाहीत." " साहेब कसं काही बोलणार...तु सांग मला.. साहेबांची कमेंटमेट तु क्लीअर कर " असे मला सांगितले. त्यानंतर दिनेश सोनवणे यांनी पुन्हा मला " तु आता किती आणलेत " अशी विचारणा केली असता, मी त्यांना " दोन... आणलेत म्हणजे आता आणतो " असे सांगितले. त्यावेळी श्री. दिनेश सोनवणे यांनी मला "बोलतो साहेबांशी.....साहेब दोन घेवुन आलाय....पाच वाजे पर्यंत आणखीण आणतोय." असे सांगितले. त्यानंतर मी दिनेश सोनवणे यांना माझे बदलीचे ऑर्डरच्या अनुशंगाने " रिलीव्हच पत्र कधी काढणार मग मला.... पैसे दिल्यावर." अशी विचारणा केली असता, श्री. दिनेश सोनवणे यांनी मला " लगेच तुला दहा मिनीटात देतो...." असे सांगितले. त्यानंतर पुन्हा मी दिनेश सोनवणे यांच्याकडे साहेबांना भेटून एकदा बोलणे करून देण्याची विनंती केल्यानंतर श्री. दिनेश सोनवणे हे श्री. पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) यांच्या केबिनमध्ये गेले व काहीवेळाने बाहेर येवून त्यांनी मला " ऐकतोस साहेब बोलले त्याच्याकडुन पाच घे....पाच वाजेपर्यंत " असे सांगितले. त्यावर मी दिनेश सोनवणे यांना " आता सध्यांकाळी पर्यंत पाच लाख तुम्हाला देतो....आणि म्हणजे उदया परवा सुट्टी आहे तीन दिवस..... मंगळवारी सकाळी...." असे बोललो असता, दिनेष सोनवणे यांनी मला " मंगळवारी सकाळी सकाळी साहेबांना येवुन भेट.....दहा-अकरा वाजता येवुन भेट...आणि ऑर्डर काढुन देतो लगेच...." असे सांगितले. त्यावेळी मी पुन्हा दिनेश सोनवणे यांच्याकडे " आता भेटायला नाही बोलले का...." अशी विचारणा केली असता, दिनेश सोनवणे यांनी मला " नाय आता नको बोलले.....तु पहिले पाच घे..." असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना होकार देवून तेथून निघून आलो होतो.
उप आयुक्त परिमंडळ- 2 कार्यालय, नवी मुंबई महानगर पालिका, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील लोकसेवक दिनेश सोनवणे, लिपीक यांनी माझी नेरूळ येथून नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालय येथे झालेली बदली पुर्ववत करण्याकरीता डॉ. अमरीष पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) यांच्यासाठी माझेकडे रू.5,00,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून मला सायंकाळी 05;00 वाजता लाचेची रक्कम घेवून बोलावले असल्याचे निश्पन्न झाल्याने लोकसेवक यांचेविरूध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले होते.
त्याप्रमाणे आम्ही सर्व पुन्हा अँन्टी करप्षन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात परत आलो. त्यावेळी सदर कार्यालयामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री. षिवराज म्हेत्रे यांनी पंचासमक्ष मला सापळापुर्व कारवाईची माहीती दिली. त्यावेळी मी पो. उप.अधीक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांच्यासुचनेप्रमाणे माझेकडे उपलब्ध असलेली रक्कम रू. 2,00,000/- ही सापळा कारवाई करीता पो.उप.अधीक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांच्यासमक्ष हजर केली. त्यावेळी लोकसेवक यांच्याकडून रू. 5,00,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी केली असून मी फक्त रू.2,00,000/- इतकी रक्कम हजर केल्याने उर्वरीत रू. 3,00,000/- इतकी रक्कम भारतीय चलनाच्या नोटांच्या कलर छायांकित प्रती वापरण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे मी दिलेली रक्कम रू. 2,00,000/- (त्यामध्ये रू. 2,000/- दराच्या 100 चलनी नोटा) व उर्वरीत रू. 3,00,000/- (त्यामध्ये रू. 2,000/- दराच्या चलनी नोटांच्या 150 कलर

छायांकित प्रती ) अषा रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा एका लखोटयामध्ये ठेवून माझेकडे दिल्या. त्यानंतर पो.उप.अधी. श्री. शिवराज म्हेत्रे यांनी सापळापुर्व कारवाई पुर्ण करून सापळा कारवाईचे अनुशंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.
श्री. दिनेश सोनवणे यांनी 05:00 वाजता येण्यासा सांगितले असल्याने त्यांना फोन करून जाण्याचे ठरविण्यता आले. त्याप्रमाणे मी पो.उप.अधीक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांच्या सुचनेप्रमाणे माझे मोबाईल नं. 9029267908 वरून श्री. दिनेश सोनवणे यांचे मोबाईल नं. 9892739653 वर व्हॉट्सअपवर कॉल करून श्री. दिनेश सोनवणे यांना येत असल्याचे सांगितले असता श्री. सोनवणे यांनी येण्यास सांगितले. सदरचे फोनवरील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले आहे. ती वेळ 16;40 वा. ची होती.
त्यानंतर मी लाचेच्या सापळा दरम्यान पंच साक्षीदार यांचे समवेत दिनांक 28/04/2023 परिमंडळ-2 कार्यालय, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे डॉ. अमरीष पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) यांचे केबिनच्या बाहेर लिपीक श्री. दिनेश सोनवणे यांना भेटलो. त्यावेळी सुरूवातीला लोकसेवक श्री. सोनवणे यांनी मला काहीवेळ थांबण्यास सांगितले. त्यामुळे मी व पंच क्रं. 1 हे कार्यालयातील सोफयावर बसून राहिलो होतो. त्यानंतर मी ऑर्डर मिळेल का याबाबत लोकसेवक श्री. सोनवणे यांच्याकडे विचारणा केली. त्यावर लोकसेवक श्री. सोनवणे हे " संध्याकाळी... मंगळवारी.....आता ते साहेबांकडे आहे ती ऑर्डर बनवायला लागेल ना.....तुला काय करायचय सोमवारी तु तिथ जायच न लगेच ऑर्डर घेवुन निघायच...." असे मला बोलले. त्यावेळी मी लोकसेवक श्री. सोनवणे यांना साहेबांशी भेट करून देणे बाबत बोललो असता, लोकसेवक श्री. सोनवणे हे पहिले पैसे दया नंतर साहेबांशी भेट करून देतो असे मला बोलले. त्यानंतर देखिल मी वारंवार साहेबांशी भेट करून देणे बाबत श्री. दिनेश सोनवणे यांच्याकडे विनंती करीत होतो परंतू लोकसेवक श्री. सोनवणे यांनी माझी साहेबांशी भेट करून दिली नाही. त्यानंतर काहीवेळाने श्री. दिनेश सोनवणे हे मला केबिनच्या समोर असलेल्या स्टोअर रूममध्ये घेवून गेले. त्यावेळी श्री. दिनेश सोनवणे यांनी मागणी केलेवरून मी माझेकडील लाचेची रक्कम रू. 5,00,000/- ठेवलेला लखोटा माझे उजव्या हाताने श्री. दिनेश सोनवणे यांच्याकडे दिला. त्यावेळी दिनेश सोनवणे यांनी त्यांचे उजव्या हाताने सदरचा लाचेची रक्कम ठेवलेला लखोटा स्विकारला. त्यावेळी मी दिनेश सोनवणे यांना " पाच लाख आहेत.... मोजून घ्या... " असे बोललो असता, श्री. दिनेशसोनवणे यांनी त्यास होकार देवून ते " आहेत ना याच्यात... दोन मिनीटात पुढे भेटून येतो " असे मला बोलून श्री. पटनिगीरे यांच्या केबिनमध्ये गेले. व लगेचच बाहेर आले. त्यावेळी त्यांच्या हातातील लखोटा उघडलेला होता. त्यानंतर श्री दिनेश सोनवणे हे मला कार्यकारी अभियंता श्री. मनोहर सोनवणे यांच्या केबीनमध्ये घेवून गेले. त्यावेळी श्री. दिनेश सोनवणे यांनी लाचेच्या रक्कमेचा लखोटा उघडला असल्याने त्यांत त्यांना नोटांच्या छायांकित प्रती बघित्यावरून त्यांनी मला " असे धंदे करू नका" असे बोलून केबीनच्या बाहेर आले. त्यावेळी मी केबिनच्या बाहेर येवून सापळा पथकास पुर्व नियोजित इशारा केल्यानंतर सापळा पथकाने श्री. दिनेश सोनवणे यांना कार्यालयाचे बाहेरील पॅसेजमध्ये जात असताना लाचेच्या रक्कमेसह 18:14 वा. ताब्यात घेतले आहे.
त्यानंतर आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द उप आयुक्त परिमंडळ-2 कार्यालय, कोपरखैरणे येथे सापळा पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली.
तरी यातील लोकसेवक दिनेश राजेंद्र सोनवणे, लिपीक टंकलेखक, नवी मुंबई महानगर पालिका, कोपखैरणे वॉर्ड, परिमंडळ- 2, नवी मुंबई राहणार जिज्ञासा को.ऑप. हौसिंग सोसायटी, रूम नं. 402, चैथा मजला, शालू हॉटेलच्या मागे, पडले देसाई गाव, ठाणे पश्चिम यांनी त्यांचे शासकीय पदाचा दुरूपयोग करून, दिनांक 28/04/2023 रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान माझी नेरूळ येथून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथे झालेली बदली पुर्ववत करण्याकरीता डॉ. अमरीश पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-2) तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग, मुख्यालय यांच्यासाठी माझेकडे रू.5,00,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून, सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक दिनेश राजेंद्र सोनवणे यांनी माझेकडून रू. 5,00,0000/- लाचेची रक्कम स्विकारली असता, लोकसेवक दिनेश सोनवणे यांना लाचेच्या रक्कमेसह 18:14 वा. सापळा पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. म्हणून माझी दिनेश राजेंद्र सोनवणे, लिपीक टंकलेखक, नवी मुंबई महानगर पालिका, कोपखैरणे वॉर्ड, परिमंडळ- 2, नवी मुंबई राहणार जिज्ञासा को.ऑप. हौसिंग सोसायटी, रूम नं. 402, चैथा मजला, शालू हॉटेलच्या मागे, पडले देसाई गाव, ठाणे पश्चिम यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AJAY HANUMANTRAO BHOSALE(I (Inspector)) / PBMH73679

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): AJAY HANUMANTRA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH73679

पोलीस ठाणे अंमलदार
कोपरखैरणे पोलीस ठाणे
नवी मुंबई

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**)**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S. (पोलीस ठाणे):** कोपरखैरणे

**District (जिल्हा):** नवी मुंबई

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 013
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 29/04/2023 08:52 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** AJAYHANUMANTRAOBHOSALE /पोलीस निरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

नमुद वेळी पोउपनि हासुरे निवेदन करतात की, कोपरखैरणे पोलीस ठाणे गुरनं168/2023 भ्रष्टाचार अधिनियम-7, 7अ, गुन्हा दाखल करताना CCTNS प्रणाली मध्ये कलम7अ हे नसल्याने ते गुन्हयाचे F.I.Rमध्ये दिसुन येत नाही, तरी सदरचा कोपरखैरणे पोलीस ठाणे गुरनं168/2023 भ्रष्टाचार अधिनियम-7, 7अ,असा दाखल केला आहे. म्हणुन नोंद.

7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

नोंद

8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 29/04/2023

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**
**Name (नाव):** AJAY HANUMANTRAO BHOSALE
**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** AJAY HANUMANTRAO
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** PBMH73679

वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोपरखैरणे, नवी मुंबई

पोलीस ठाणे अमलदार
कोपरखैराणे पोलीस ठाणे
नवी मुंबई

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S. (पोलीस ठाणे):** कोपरखैरणे **District (जिल्हा):** नवी मुंबई

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 015
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 29/04/2023 08:58 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** अटक/शरण
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** AJAYHANUMANTRAOBHOSALE /पोलीस निरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

नमुद वेळी पोउप अधिक्षक शिवराज म्हेत्रे निवेदन करतात की, कोपरखैरणे पोलीस ठाणे गुरनं 168/23 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 संशोधन 2018चे कलम 7,7 अ अन्वये दाखल गुन्हयामध्ये आरोपी लोकसेवक दिनेश राजेंद्र सोनवणे लिपीक टंकलेखक कोपरखैरणे वॉर्ड परिमंडळ 2नवी मुंबई यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले असुन त्यांचे अटकेची माहीती त्याचा भाउ नामे- नितीन राजेंद्र सोनावणे यांना समक्ष देण्यत आली आहे, आरोपी यांना सुरक्षिततेकामी APMCपोलीस ठाणे येथे लॉकअप मध्ये ठेवत आहोत म्हणुन नोंद.

7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

अटक आरोपी

8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 29/04/2023

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** AJAY HANUMANTRAO BHOSALE

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** AJAY HANUMANTRAO

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** PBMH73679

वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोपरखैरणे, नवी मुंबई

पोलीस ठाणे अमलदार
कोपरखैराणे पोलीस ठाणे
नवी मुंबई